# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## जागतिक मिशन रविवार
## उपासना




(२४ ऑक्टोबर २०२१, सामान्य काळातील ३० वा रविवार, वर्ष ः दुसरे)

**प्रस्तावना मिस्साच्या सुरूवातीला वाचणे ः**

मिशन रविवार बाप्तिस्मा झालेल्या प्रत्येक कॅथोलिक व्यक्तीला जगभरातील ख्रिस्ताच्या एकाच मिशनमधील सहभागाची आठवण करून देतो. प्रत्येक वर्षी मिशन रविवारी आपण परदेशातून आलेल्या आणि आपल्यामध्ये कार्यरत असलेल्या मिशन-यांची तसेच आपल्यामधून ख्रिस्ताची सुवार्ता इतरत्र पसरवण्यासाठी गेलेल्या मिशन-यांची विशेष आठवण करतो. त्याचप्रमाणे आपण सर्वांनी जागतिक मिशनसाठी दिलेल्या योगदानाची देखील ह्या दिवशी आठवण करतो.

“जे आम्ही पाहिले व ऐकले ते न बोलणे हे आम्हाला शक्य नाही”. (प्रे.कृ.४ः२०) हे घोषवाक्य ह्यावर्षी केंद्रस्थानी ठेवून आपण मिशन रविवार साजरा करीत आहोत. जशा आपल्या जीवनात चांगल्या गोष्टी ओसंडून वाहतात आणि ज्या सहजपणे इतरांच्या लक्षात येतात तसे सुरूवातीच्या ख्रिस्ती समुदायाचे जीवन ख्रिस्तप्रेमाने ओत - पोत भरलेले होते. त्यांनी सर्व अडचणींचा सामना करीत ख्रिस्ताचे प्रेम इतरांबरोबर वाटले. त्याचप्रमाणे ज्यांनी खरोखर ख्रिस्ताच्या प्रेमाचा अनुभव घेतलेला आहे तो अनुभव फक्त आपल्या स्वतःसाठीच मर्यादित न ठेवता आपल्या शब्दाद्वारे आणि कृतींद्वारे इतरांबरोबर सुद्धा वाटला पाहिजे.

कोरोना महामारीच्या ह्या गुंतागुंतीच्या काळामध्ये आपल्या अडचणी वाढलेल्या असतानादेखील आपण सर्वांनी ख्रिस्ताच्या प्रेमाचे खरे साक्षीदार व्हावे अशी आपल्याकडून अपेक्षा केली जात आहे. चर्चच्या ह्या मिशनकार्यामध्ये आपण पुढीलप्रमाणे सहभागी होऊ शकतो. प्रथम सर्व मिशन-यांसाठी आणि मिशन कार्यासाठी प्रार्थना करणे, मिशनकार्य समृद्ध व्हावे म्हणून प्रोत्साहन देणे, जागतिक मिशनकार्यासाठी उदारहस्ते मदत करणे आणि आपल्या जीवनाच्या प्रत्येक टप्प्यामध्ये मिशनरी बनून ख्रिस्ताच्या प्रेमाचा अनुभव इतरांना सांगणे.

मिशन रविवारच्या ह्या पवित्र मिस्साबलीदानामध्ये सहभागी होत असताना पवित्र आत्म्यामध्ये एक होऊन आपल्या प्रत्येकाच्या मिशनकार्यासाठी आणि सर्व मिशन-यांसाठी आपण विशेष प्रार्थना करू या.

**प्रवचनासाठी मुद्दे ः**

प्रत्येक वर्षी ऑक्टोबर महिन्यातील तिसरा रविवार आपण “मिशन रविवार” म्हणून साजरा करतो ह्याची ख्रिस्ती भाविकांना जाणीव आहे. “मिशन रविवार” आपणास चर्चच्या जागतिक मिशनची आठवण करून देतो.

**मिशन म्हणजे काय?**

ख्रिस्तसभेच्या सुरूवातीपासून 'मिशन' हा शब्द ख्रिस्तसभेसाठी फार प्रिय आहे कारण त्यासाठीच चर्चचे अस्तित्व आहे. मिशन हा शब्द "मिसीयो" ह्या लॅटीन शब्दापासून आलेला आहे. ज्याचा अर्थ आहे "पाठवणे'. आपणा सर्वांना प्रभू येशूची सुवार्ता घोषित करण्यासाठी पाठवण्यात आले आहे. बाप्तिस्मा साक्रामेंताद्वारे आपण प्रभू येशू ख्रिस्ताच्या मिशनमध्ये सहभागी होतो. प्रभू येशू ख्रिस्ताचे मिशन त्याच्या अनुयायांकडे सुपूर्द करण्यात आले आहे आणि त्यांनी ते पुढे नेले पाहिजे. म्हणून "सर्वांना पाठवण्यात आले आहे". प्रभू ख्रिस्ताची शुभवार्ता सर्व लोकांपर्यंत पोहचली पाहिजे. सुरूवातीपासून ख्रिस्तसभा हे मिशन सिद्धीस नेण्यासाठी झटत आहे आणि ख्रिस्तसभेचे अविभाज्य घटक म्हणून आपणदेखील ह्या मिशनसाठी झटले पाहिजे.

**मिशनसाठी आदेश**

प्रभू येशू ख्रिस्ताने स्वतः आपणास मिशनचा आदेश दिलेला आहे.

"सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा". (मार्क १६:१५)

मत्तय २८ : १९-२० मध्ये हा आदेश तीन गोष्टीमध्ये विभागलेला आहे. सर्व राष्ट्रांतील लोकांस **शिष्य करा,** यांस पित्याच्या पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावाने **बाप्तिस्मा** द्या आणि मी तुम्हास जे शिकविले ते त्यांस पाळावयास **शिकता**.

"जसे पित्याने मला पाठवले  तसे मी तुम्हाला पाठवितो". (योहान २०: २१)

प्रभू येशू ख्रिस्ताच्या आज्ञा पाळणे हा चर्चसमोर एक पर्याय नाही तर दुस-या व्हॅटीकन धर्मपरिषदेच्या शिकवणुकीनुसार मिशन हे चर्चचे "अत्यावश्यक कार्य" आहे. कारण मुळात चर्च हे मिशनरी आहे. ख्रिस्ताची शुभवार्ता घोषित करणे हे चर्चचे पाचारण आहे आणि शुभवार्ता घोषित करण्यासाठीच चर्च अस्तित्वात आहे.

**बार्तीमय मिशनरी**

आजच्या शुभवर्तमानात आंधळया बार्तीमयचे उत्तम उदाहरण आपल्या समोर आहे की त्याचा मिशन प्रवास कसा चालू झाला. जेव्हा प्रभू येशूने त्याला बोलावले तेव्हा तो आपले वस्त्र टाकून उठला म्हणजे प्रतिकात्मक दृष्टीकोनातून त्याने आपल्यामधील जुन्या मनुष्याला मागे टाकले आणि नवीन जीवनाची सुरूवात करण्यासाठी तो येशूकडे आला. फक्त आपला शारीरिक आंधळेपणा बरे करण्यासाठी नव्हे तर आपल्या अंतर्यामाला बरे करण्यासाठीदेखील तो येशूकडे आला आणि म्हणाला, "गुरूजी, मला दृष्टी प्राप्त व्हावी". येशूने त्याला म्हटले, "जा, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे". तेव्हा लागलीच त्याला दृष्टी आली आणि तो येशूच्या मागे चालू लागला. ह्या घटकेपासून तो खराखूरा मिशनरी झाला. खरा मिशनरी प्रभू येशूच्या मागे चालत जातो. बार्तीमयने प्रथम येशूवर विश्वास ठेवला, "अहो दावीदपुत्र येशू, माझ्यावर  दया करा". तो आपल्या विश्वासामध्ये दृढ राहिला आणि त्या विश्वासामुळे तो बरा झाला आणि मिशनरी बनला. विश्वास आणि मिशन हे अविभाज्य आहेत. पवित्र आत्म्याच्या प्रेरणेनेच आपण विश्वास राखू शकतो आणि मिशनकार्य करू शकतो.

**मी मिशन आहे**

विश्वास इतरांबरोबर जेव्हा वाटला जातो तेव्हाच तो दृढ होत असतो. म्हणून पोप फान्सिस सांगतात की प्रभू येशूची मिशनची आज्ञा आम्हाला वैयक्तिकरीत्या स्पर्श करते. "मी सदैव मिशन आहे, तुम्ही सदैव मिशन आहात, बाप्तिस्मा झालेली प्रत्येक व्यक्ती मिशन आहे". "मी मिशनरी आहे" असे पोप महोदय सांगत नाहीत तर "मी मिशन आहे" असे सांगतात. म्हणजे मिशन माझ्याबाहेर नाही तर माझ्यामध्ये आहे आणि मी स्वतः मिशन आहे. मिशनरी म्हणून माझ्या केवळ काही बाह्य जबाबदा-याच नाहीत तर माझ्या जीवनाद्वारे मी मिशनचे एक जिवंत उदाहरण बनले पाहिजे. माझे वागणे, बोलणे आणि कृती मला मिशनचे जिवंत उदाहरण बनवील आणि इतरांना कळेल की मी प्रभू येशूचा अनुयायी आहे (पाहा योहान १३ : ३५). मी माझ्या जीवनाने प्रभू येशूचे शुभवर्तमान इतरांपर्यंत पोहचवितो आणि हेच चर्चचे पहिले धोरण आहे.

**सिनड चर्चच्या मिशनमध्ये सहभागी होण्याची संधी**

"सिनड" ह्या शब्दाचा अर्थ आहे "एकत्र चालणे" किंवा "एकत्र प्रवास करणे". सिनडचा मुख्य विषय आहे "एकता, सहभाग आणि मिशन". तिन्ही शब्द परस्परसंबंधित आहेत आणि त्यांना अलग करता येणार नाही. ह्याचाच अर्थ असा की चर्चचे मिशन हे एकटयाला करता येत नाही तर ते संयुक्तरीत्या केले पाहिजे. म्हणून सर्वांनी ह्या मिशनमध्ये सहभागी झाले पाहिजे. सुरू झालेली सिनड चर्चच्या मिशनमध्ये सहभागी होण्यासाठी एक अनमोल संधी आहे.

ह्या सिनडमध्ये सहभागी होण्यासाठी सर्वांना आमंत्रण आहे आणि सिनडचे मुख्य उद्दिष्ट आहे "सर्वांचे ऐका" आणि एकमेकांचे ऐकताना मुख्यत्वे आपण पवित्र आत्म्याचे ऐकावे. हे फक्त निष्क्रिय ऐकणे नसेल तर सक्रीय ऐकणे असेल ज्यामधून ठराविक महत्वाच्या बाबी उघडकीस येतील ज्या चर्चच्या उन्नतीसाठी फायदेशीर ठरतील.

शेवट करताना मला मिशनरी होण्यासाठी पाचारण करण्यात आले आहे. हा माझ्यासाठी एक पर्याय नाही तर ते माझ्यासाठी बंधनकारक आहे. प्रभू येशूने दिलेली मिशनची आज्ञा मी मनापासून पाळली पाहिजे. मी पुढील प्रश्नांवर मनन चिंतन करणे गरजेचे आहे : मला खरोखर चर्चचे मिशन कळले आहे का? ह्या मिशनसाठी माझी काय जबाबदारी आहे? मिशनचा खरा अर्थ आपणास कळावा म्हणून आपली अंतःकरणे पवित्र आत्म्याच्या कृपेकडे उघडी करू या आणि पवित्र आत्म्याबरोबर प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाची साक्ष देण्यास आपण पात्र ठरावे म्हणून परमेश्वराचा आशीर्वाद मागू या.

**श्रद्धावंताच्या प्रार्थना**

धर्मगुरू : आंधळया बार्तीमयला बरे करणारा प्रभू येशू आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी सदैव तयार असतो. प्रभू येशू ख्रिस्ताच्या ह्या कृपेवर विश्वास ठेवून चर्चच्या मिशनकार्यासाठी तसेच आपल्या विविध गरजांसाठी प्रभूजवळ आपण प्रार्थना करू या.

आपला प्रतिसाद : हे प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, सर्व बिशप्स, धर्मगुरू, व्रतस्थ आणि प्रापंचिक ह्या सर्वांना ख्रिस्ताच्या प्रेमाचे खरे साक्षीदार होण्यासाठी चांगले आरोग्य आणि योग्य ते साहाय्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. प्रत्येक मिशन विभागात कार्य करीत असलेल्या मिशन-यांना ख्रिस्ताच्या प्रेमाचा आणि दयेचा अनुभव यावा आणि तोच अनुभव ते प्रभूची शुभवार्ता ऐकणा-या लोकांबरोबर वाटून घेण्यास पात्र ठरावेत म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. मिशनकार्यासाठी उदारहस्ते मदत करणा-यांचे वाईटांपासून नेहमी संरक्षण व्हावे, त्यांची नेहमी भरभराट होऊन प्रेम, आनंद आणि शांती ह्यांनी त्यांचे जीवन समृद्ध व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. ह्या पवित्र मिस्सासाठी एकत्र जमलेल्या आपल्या सर्वांवर प्रभूच्या दयेचा आणि प्रेमाचा वर्षाव व्हावा, प्रभूवरील आपला विश्वास वाढावा आणि जीवनातील अंधारावर मात करून आपण प्रकाशाची साक्ष देण्यास पात्र ठरावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. मृत मिशन-यांसाठी, ज्यांचा मिशनमुळे छळ झाला आणि मिशनकार्यासाठी ज्यांनी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले, त्या सर्व मृत मिशनरी लोकांना प्रभूच्या स्वर्गीय जीवनात प्रवेश मिळावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

६. थोडावेळ शांत राहून आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी आपण प्रार्थना करू या.

**धर्मगुरू ः** हे परमेश्वर पित्या, तू आम्हाला विश्वासाची देणगी देऊन आणि मिशनरी आदेश असलेले संत फ्रान्सिस झेविअर, बाळ येशूची संत तेरेजा असे अनेक संत देऊन आशीर्वादित केले आहे. त्यांच्याप्रमाणे बाप्तिस्मांमधून झालेल्या पाचारणामध्ये जगभरातील ख्रिस्ताच्या मिशनमध्ये सहभागी होण्यास आम्ही पात्र ठरावे म्हणून आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## मिशनसाठी प्रार्थना (कम्युनियन नंतर)

स्वर्गीय पित्या, जेव्हा तुझा एकुलता एक पुत्र येशू ख्रिस्त मरणातून पुन्हा उठला तेव्हा त्याने आपल्या अनुयायांना “जा आणि सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा” अशी आज्ञा केली. आमच्या बाप्तिस्म्याद्वारे आम्ही चर्चच्या ह्या मिशनमध्ये सहभागी झालो आहोत ह्याची तू आम्हाला आठवण करून देतोस.

पवित्र आत्म्याच्या दानांमुळे शुभवर्तमानाचे साक्षीदार होण्यासाठी आम्हाला धैर्यवान आणि उत्साही बनव, जेणेकरून चर्चला सोपवण्यात आलेले मिशन जे पूर्ण होण्यापासून अजून खूप दूर आहे त्या मिशनला नवीन आणि प्रभावी आविर्भाव मिळेल आणि जगाला प्रकाश व नवजीवनाचा लाभ होईल.

प्रभू येशू ख्रिस्ताच्या प्रेमाचा आणि दयेचा अनुभव सर्व लोकांपर्यंत पोहचवण्यास आम्ही पात्र ठरावे म्हणून आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा एकच परमेश्वर तुझा पुत्र आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो. आमेन.

## भव्य आशीर्वाद

धर्मगुरू ः प्रभू तुम्हाबरोबर असो .

लोक ः आणि तुम्हाबरोबर सुद्धा .

आपली मान नम्रतेने खाली वाकवा व देवाच्या आशीर्वादासाठी प्रार्थना करा .

सर्व सांत्वनाचा परमेश्वर तुम्हाला त्याच्या आशीर्वादाची दाने बहाल करो व तुम्हाला आयुष्यभर शांती देऊन सर्व चिंतेपासून मुक्त करो व आपल्या प्रेमाने तुमचे हृदय सबळ करो .

**आमेन .**

ज्या परमेश्वराने आपल्या इतस्ततः पसरलेल्या लेकरांना त्याचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याच्यामध्ये एकत्र आणण्याची योजना आखली तो परमेश्वर तुम्हाला पवित्र आत्म्याचे मंदिर बनवो .

**आमेन .**

परमेश्वर तुम्हाला सत्यात समर्पित करो आणि त्याच्या आज्ञा पाळण्याचे शिकवून तुम्हाला त्याच्या स्वर्गीय राज्याचे वारसदार बनवो .

**आमेन .**

सर्वसमर्थ परमेश्वर पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा तुम्हास आशीर्वाद देवो .

**आमेन .**